# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## अहवाल २०२६

## “शिक्षक दिन व सत्कार समारंभ”

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे दिनांक ५ सप्टेंबर २०२६ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल व माजी विद्यार्थी संघ, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य मा. डॉ. रमा भोसले मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. श्रीकांत महादेव ठाकूर, अध्यक्ष, समाज प्रबोधन शिक्षण संस्था, उरण; मा. श्री. दिलीप बारकाजी म्हात्रे, सचिव, समाज प्रबोधन शिक्षण संस्था, उरण; तसेच मा. डॉ. सुनिता आत्माराम लोंढे, मा. श्री. सुरेश गावंड, मा. श्री. वैभव पाटील उपस्थित होते. याशिवाय मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार, मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे, मा. डॉ. उज्वला डोणे, मा. डॉ. कुसुम चौधरी, मा. डॉ. हर्षानी पात्रे, मा. डॉ. छाया शिरसाट, मा. डॉ. जयप्रभा आसोरे, मा. प्रा. प्रज्ञा जाधव, मा. डॉ. अरुणादेवी कुरणे, सौ. मंगल आवटे, श्रीमती प्रज्ञा जाधव (प्र. सहाय्यक), सौ. शाईन मुजावर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, छात्राध्यापक-छात्राध्यापिका व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लेझीमच्या आकर्षक खेळाने झाली. लेझीमच्या तालात मान्यवर पाहुण्यांचे महाविद्यालयाच्या परिसरात आगमन झाले. त्यानंतर मान्यवरांचे औक्षण करून त्यांचे स्वागत करण्यात आले. पुढे वंदे मातरम् सादर करण्यात आले. त्यानंतर सरस्वती पूजन, दीपप्रज्वलन व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची मंगल सुरुवात करण्यात आली.

मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे यांनी आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व, शिक्षकांचे समाजातील स्थान आणि विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांची भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर मा. श्री. सुरेश गावंड यांनी उपस्थित मान्यवरांचा परिचय करून दिला.

यानंतर द्वितीय वर्षातील छात्राध्यापक श्री. विशाल गावित आणि संघ यांनी स्वागतगीत सादर करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. तसेच महाविद्यालयाची सुंदर परंपरा जपत श्री. जयेश नडगे आणि संघ यांनी ‘आम्ही चालवू पुढे वारसा’ हे गीत सादर करण्यात आले. या गीतातून ज्ञान, संस्कार आणि गुरू-शिष्य परंपरेचा वारसा पुढे नेण्याचा संदेश देण्यात आला.

त्यानंतर उपस्थित प्रमुख पाहुणे व मान्यवरांचा शाल, पुस्तक व गुलाबपुष्प देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. रमा भोसले यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयातील प्राध्यापकांचाही छात्राध्यापकांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमातील विशेष भावनिक क्षण म्हणजे मा. डॉ. सुनिता आत्माराम लोंढे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा करण्यात आलेला सन्मान होय. द्वितीय वर्षातील छात्राध्यापक श्री. विशाल गावित यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. त्यानंतर प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते डॉ. सुनिता लोंढे यांना सन्मानपत्र प्रदान करून त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला.

यानंतर कार्यक्रमातील विशेष आकर्षण असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभास सुरुवात झाली. M.Ed., Y.C.M.O.U. B.Ed. and Regular B.Ed. अभ्यासक्रमातील गुणवंत विद्यार्थ्यांचा ट्रॉफी व गुलाबपुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते

सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करताना उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या सत्कारामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व प्रेरणा मिळाली.

यानंतर श्रीमती शिवानी चौरागडे यांनी शिक्षकांविषयीच्या भावना व्यक्त करणारी स्वरचित कविता सादर केली. त्यांच्या भावपूर्ण कवितेला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

त्यानंतर मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. सेवानिवृत्त प्राध्यापिका डॉ. सुनिता लोंढे यांनी भावूक मनोगत व्यक्त केले. आपल्या सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त करत आपल्या सेवाकाळातील अनुभव आणि शिक्षक म्हणून लाभलेले समाधान व्यक्त केले.

समाज प्रबोधन शिक्षण संस्था सचिव मा. श्री. दिलीप म्हात्रे यांनी शिक्षकांचे समाजातील स्थान, त्यांचे योगदान आणि विद्यार्थ्यांच्या घडणीत शिक्षकांची भूमिका यावर प्रेरणादायी विचार मांडले. त्यानंतर मा. श्री. श्रीकांत ठाकूर, समाज प्रबोधन शिक्षण संस्था अध्यक्ष यांनी शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांना शुभेच्छा देत शिक्षण क्षेत्रातील बदलत्या जबाबदाऱ्या व शिक्षकांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाच्या प्राचार्य मा. डॉ. रमा भोसले यांनी शिक्षक हा समाजाचा दीपस्तंभ असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती शिवानी डोईफोडे यांनी आत्मविश्वासपूर्ण व प्रभावीपणे केले. आपल्या ओघवत्या निवेदनशैलीने त्यांनी कार्यक्रमाला सुंदर रंगत आणली. कार्यक्रमाच्या शेवटी श्रीमती प्रियंका कांबळे यांनी प्रभावीपणे आभार प्रदर्शन केले. त्यांनी सर्व मान्यवर, प्राध्यापक, विद्यार्थी व उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे यांच्या मार्गदर्शनानुसार संपूर्ण वेळेत शिस्त, शांतता व उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या हा कार्यक्रम संपन्न झाला.


शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल
(द्वितीय वर्ष बी. एड.२०२५-२७)
डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती
शिक्षक दिन व सत्कार समारंभ
निमंत्रण पत्रिका

आपणास कळविण्यात आनंद होत आहे की, **०५ सप्टेंबर, २०२६** रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय,पनवेल आणि माजी विद्यार्थी संघ,पनवेल यांच्या संयुक्त विद्यमानाने '**शिक्षक दिन व सत्कार समारंभ** ' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

प्रमुख पाहुणे
मा. श्री. श्रीकांत महादेव ठाकूर
अध्यक्ष- समाज प्रबोधन शिक्षण संस्था,उरण
मा. श्री. दिलीप बारकाजी म्हात्रे
सचिव - समाज प्रबोधन शिक्षण संस्था,उरण
मा. डॉ. सुनिता आत्माराम लोंढे

आयोजक
मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे

अध्यक्ष
मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले

प्रमुख उपस्थिती
मा.प्रा.डॉ. प्रियांका सुभेदार
कार्याध्यक्ष- श्री. सुरेश गावंड
मा. डॉ. उज्वला डोणे
सचिव- श्री.वैभव पाटील

स्थळ:- सरस्वती कक्ष
वेळ :- सकाळी ११:०० वा.


शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल
द्वितीय वर्ष बी. एड.:२०२५-२७
डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती
शिक्षक दिन व सत्कार समारंभ
कार्यक्रम पत्रिका
०५ सप्टेंबर, २०२६

| | |
|---|---|
| सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन | मा.प्राचार्य आणि प्रमुख पाहुणे, सर्व प्राध्यापक वृंद |
| स्वागत गीत | श्री.विशाल गावित व सहकारी |
| गीत गायन | श्री.जयेश नडगे व सहकारी |
| सूत्रसंचालक | श्रीमती.शिवानी डोईफोडे |
| प्रास्ताविक | मा.प्रा.डॉ .नीलिमा मोरे |
| पाहुण्यांचा परिचय | मा.श्री सुरेश गावंड |
| पाहुण्यांचे स्वागत व सत्कार | मा.प्राचार्य. डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते |
| मा.प्राचार्य. डॉ. रमा भोसले यांचा सत्कार | मा.प्रा.डॉ. नीलिमा मोरे |
| प्राध्यापकांचे स्वागत व सत्कार | छात्रध्यापकांच्या हस्ते |
| सन्मानपत्र वाचन | श्री. विशाल गावित |
| सन्मानपत्र प्रदान | मा. प्राचार्य.डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते |
| माजी विद्यार्थी सत्कार | प्राचार्य,अध्यक्ष,सचिव व प्राध्यापक यांच्या हस्ते |
| माजी विद्यार्थी मनोगत | बी.एड.,एम.एड., वाय.सी.एम.ओ.यू. विद्यार्थी |
| कविता वाचन | श्रीमती.शिवानी चौरागडे |
| सत्कारमूर्ती यांचे मनोगत | मा.डॉ. सुनिता लोंढे |
| प्रमुख पाहुण्यांचे मनोगत | मा.श्री. दिलीप म्हात्रे, मा.श्री. श्रीकांत ठाकूर |
| अध्यक्षीय मनोगत | मा.प्राचार्य. डॉ. रमा भोसले |
| आभार | श्रीमती प्रियंका कांबळे |
| निमंत्रण व कार्यक्रम पत्रिका | श्री. सुनिल चौधरी |
| फोटो व व्हिडिओग्राफी | श्री.प्रल्हाद गावित व श्री.दत्ता झुगरे |
| फलक लेखन | श्री.नितीन कवाड |

स्थळ:- सरस्वती कक्ष
वेळ :- सकाळी ११:०० वा.




**लेझीमच्या तालात मान्यवरांचे आगमन**




**मान्यवरांचे औक्षण करतानाचे क्षण**




**वंदे मातरम सादर करून देशभक्ती आणि राष्ट्रप्रेम व्यक्त करतानाचे क्षण**




**मान्यवर सरस्वती पूजन, दीप प्रज्वलन, आणि प्रतिमा पूजन करताना**




**मा. आयोजिका प्रा. डॉ. नीलिमा मोरे प्रभावीपणे प्रास्ताविक सादर करताना**




**मा. सुरेश गावंड सुंदर रित्या मान्यवरांचा परिचय देताना**




श्री. विशाल गावित आणि संघ स्वागत गीत सादर करताना




"आम्ही चालू पुढे वारसा" हे गीत सादर करताना श्री. जयेश नडगे आणि संघ




मा. प्राचार्या डॉ. रमा भोसले ह्या प्रमुख पाहुणे मा. श्री. श्रीकांत ठाकूर यांचा सत्कार करताना




मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे ह्या अध्यक्षा आणि प्राचार्या मा. डॉ. रमा भोसले यांचा सत्कार करताना




मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार यांचा सत्कार करताना द्वितीय वर्ष छात्राध्यापक श्री. प्रशांत डोकफोडे




मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे यांचा सत्कार करताना द्वितीय वर्ष छात्राध्यापिका श्रीमती निशा जाधव




मा. प्रा. डॉ. उज्वला डोणे यांचा सत्कार करताना द्वितीय वर्ष छात्राध्यापिका श्रीमती स्मिता मोरघा




Adv. प्रज्ञा जाधव ह्यांचा द्वितीय वर्ष छात्राध्यापिका श्रीमती प्रतिभा चाबके सत्कार करताना




मा. प्रा. डॉ. कुसुम चौधरी यांचा सत्कार करताना द्वितीय वर्ष छात्राध्यापिका श्रीमती देवयानी खोत




मा. प्रा. डॉ. छाया शिरसाठ यांचा सत्कार करताना द्वितीय वर्ष छात्राध्यापिका श्रीमती प्राची गरड




मा. प्रज्ञा जाधव यांचा सत्कार करताना द्वितीय वर्ष छात्राध्यापिका श्रीमती नेहा लहाने




द्वितीय वर्ष छात्राध्यापक श्री. विशाल गावित डॉ. सुनिता लोंढे यांच्या सेवानिवृत्त सन्मानपत्र चे वाचन करताना




मा. प्राचार्या डॉ. रमा भोसले सेवानिवृत्त सन्मान पत्र, शाल, गुलाब पुष्प डॉ. सुनीता लोंढे यांना प्रदान करताना




बी. एड. प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या श्रीमती तनुश्री आठवले यांचा सत्कार प्रमुख पाहुणे श्री. श्रीकांत ठाकूर यांच्या हस्ते होताना




मा. श्री. दिलीप म्हात्रे यांच्या हस्ते बी. एड. द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या श्रीमती अनघा म्हात्रे यांचा सत्कार




डॉ. सुनिता लोंढे यांच्या हस्ते बी. एड. तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या श्रीमती वर्षा आतकर यांचा सत्कार




रेग्युलर एम. एड. प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या श्रीमती अर्चना झावरे यांचा सत्कार प्रमुख पाहुणे श्री. श्रीकांत ठाकूर यांच्या हस्ते होताना




रेग्युलर एम. एड. द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या श्रीमती रेजोशा राजेंद्रन यांचा सत्कार डॉ. कुसुम चौधरी यांच्या हस्ते होताना







<u>**रेग्युलर एम. एड. तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या श्रीमती चित्रा कोणार यांचा सत्कार श्री. वैभव पाटील यांच्या हस्ते होताना**</u>

<u>**वाय. सी. एम. ओ. यु. बी. एड. च्या प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या श्रीमती अर्चना म्हात्रे यांचा सत्कार प्राचार्या डॉ. रमा भोसले मॅडम आणि डॉ. कुसुम चौधरी यांच्या हस्ते होताना**</u>







<u>**वाय. सी. एम. ओ. यु. बी. एड. च्या द्वितीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या श्रीमती प्रणिता घरत यांचा सत्कार श्री. गावंड सरांच्या हस्ते होताना**</u>

<u>**वाय. सी. एम. ओ. यु. बी. एड च्या तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या श्री. राजेंद्र गर्जे यांचा सत्कार मा. डॉ. सुनिता लोंढे यांच्या हस्ते होताना**</u>







<u>**एम. एड. छात्राध्यापिका रेजोशा राजेंद्रन आपले मनोगत व्यक्त करताना**</u>

<u>**वाय. सी. एम. ओ. यु. बी. एड मधील श्री. राजेंद्र गर्जे मनोगत व्यक्त करताना**</u>




बी. एड. मधील तनुश्री आठवले मनोगत व्यक्त करताना




श्रीमती शिवानी चौरागडे स्वरचित कविता सादर करताना




डॉ. सुनिता लोंढे सन्मानाला प्रेमळ उत्तर प्रदान करताना




मा. श्री. दिलीप म्हात्रे मार्गदर्शन व मनोगत व्यक्त करताना




मा. श्री. श्रीकांत ठाकूर मार्गदर्शन व मनोगत व्यक्त करताना




मा. प्राचार्या डॉ. रमा भोसले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना







**श्रीमती शिवानी डोईफोडे कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे सूत्रसंचालन करताना**

**श्रीमती प्रियंका कांबळे आभार प्रकटीकरण करताना**







**श्री. नितीन कवाड यांनी केलेले सुंदर फलक लेखन**

**श्री. यश पाटील यांनी काढलेली सुंदर रांगोळी**